सकाळ

# कर्मवीर स्मृती करंडक कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन

नाशिक, ता. १२ : आजचा युवक हा सोशल मीडियाच्या नको तेवढा आहारी गेला आहे. त्याचे दुष्परिणाम आपण समाज व्यवस्थेत झालेले पाहतो आहे. तरी पालकांनी आपल्या पाल्यांमध्ये खेळाची आवड निर्माण करून त्यास प्रोत्साहित केले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रीय खेळाडू राधिका गाडगीळ-पैठणकर यांनी केले.

वाघ शिक्षण संस्था, स्माइल व स्पिनॅच नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने काकासाहेबनगर महाविद्यालयात पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृतिचषक क्रीडा स्पर्धांना प्रारंभ झाला. काकासाहेबनगर शैक्षणिक संकुलात उद्घाटनप्रसंगी त्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्माइल व स्पिनॅच नाशिक संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ उपस्थित होते. ४४ संघांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. प्राचार्य डॉ. अतुल गवारे यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. प्राचार्य शरद कदम यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मिलिंद पवार आणि प्रा. गणेश आवारे यांनी सूत्रसंचालन केले. आभार क्रीडा संचालक सुजित मेधने यांनी मानले. क्रीडा संचालक प्रा. सुनील निरगुडे, प्रा. किरण वाघ, एस. पी. क्षीरसागर, नेताजी वाघ, रमाकांत जाधव, विलास वाघ, रामनाथ पानगव्हाणे, जयवंत वाघ, दत्तात्रेय डुंबरे, अशोक आहेर, बाळासाहेब वाघ, पी. आर. जाधव, मधुकर देशमुख, अशोक सोमवंशी, सुनील वाघ, केशव शिंदे, रामभाऊ थेटे, संदीप साबळे, तेजेंद्र वाघ उपस्थित होते.

Nashik, Nashik-Today
13/01/2023 Page No. 4

पुढारी




नाशिक : कर्मवीर स्मृती चषक कबड्डी स्पर्धांच्या उद्घाटनाप्रसंगी बोलताना स्माइल व स्पिनॅच नाशिक संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ. समवेत मान्यवर.

# 'कर्मवीर' कबड्डी स्पर्धेला प्रारंभ

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माइल व स्पिनॅच यांच्या संयुक्त विद्यमाने काकासाहेबनगर महाविद्यालयात आयोजित पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती चषक क्रीडा स्पर्धे अंतर्गत काकासाहेबनगर येथील शैक्षणिक संकुलात कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रीय खेळाडू राधिका गाडगीळ-पैठणकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्माइल व स्पिनॅच नाशिक संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ होते. स्पर्धेत ४४ संघ सहभागी झाले आहेत. यावेळी प्राचार्य डॉ. अतुल गवारे, क्रीडा संचालक प्रा. सुनील निरगुडे, प्रा. किरण वाघ, एस. पी. क्षीरसागर, नेताजी वाघ, रमाकांत जाधव, विलास वाघ, रामनाथ पानगव्हाणे, बाळासाहेब वाघ, पी. आर. जाधव, मधुकर देशमुख, अशोक सोमवंशी, सुनील वाघ, केशव शिंदे, रामभाऊ थेटे, संदीप साबळे, तेजेंद्र वाघ आदी उपस्थित होते. प्राचार्य शरद कदम यांनी प्रास्ताविक, तर प्रा. मिलिंद पवार आणि प्रा. गणेश आवारे यांनी सूत्रसंचालन केले. क्रीडा संचालक सुजित मेधने यांनी आभार मानले.

Nashik Edition
Jan 13, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# बाळासाहेब वाघ यांच्या नावे राहुरी विद्यापीठात पुरस्कार

▸▸ नाशिक | दि. १३ प्रतिनिधी

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे नुकताच ३६ वा पदवीदान समारंभ पार पडला. याप्रसंगी शासकीय कृषी महाविद्यालय, पुणे येथे २०२१-२२ या वर्षी बी.एस्स.सी (कृषी) या शाखेत महाविद्यालयातून सर्व विषयात प्रथम तर महात्मा फुले कृषी विद्यापीठाशी संलग्न सर्व कृषी महाविद्यालयातून बी.एस्सी (कृषी) या शाखेत विद्यापीठात प्रथम आलेली अपूर्वा वामन या विद्यार्थीनीला कै. बाळासाहेब वाघ यांचे नावे दोन सुवर्ण पदके प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यावेळी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते. कृषी मंत्री अब्दुल सत्तार, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, डॉ. चारुदत्त मायी, राहुरी



विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील व आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासून बाळासाहेब वाघ यांनी तब्बल ५१ वर्षे खंबीरपणे संस्थेची धुरा सांभाळली. संस्था उभारणीत त्याचा सिंहाचा वाटा आहे. या पार्श्वभूमीवर संस्थेने सन २०२१-२२ पासून दरवर्षी त्यांच्या नावे राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात दोन सुवर्ण पदके दिली जात आहेत. पहिले सुवर्ण पदक हे शासकीय कृषि महाविद्यालय, पुणे येथून बी.एस्सी ॲग्री शाखेत प्रथम तर राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात सर्व कृषी महाविद्यालयांमधून बी.एस्सी ॲग्री शाखेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला दुसरे सुवर्ण पदक देण्यात येतात.

---

सकाळ

# यंदा व्यावसायिक अभ्यासक्रमांचे वेळेतच प्रवेश

## सीईटी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर : मार्चपासून होणार सुरवात

▸ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १३ : विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या सीईटी परीक्षांना विलंब झाल्याने पुढील संपूर्ण वेळापत्रक खोळंबत होते. शैक्षणिक वर्ष २०२३- २४ मध्ये हा खोळंबा टाळला जाण्याची शक्यता आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सीईटी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रव जाहीर केलेले आहे. मार्च महिन्यापासू या परीक्षा नियोजित असल्यान जुलै-ऑगस्टपर्यंत प्रवेश प्रक्रिय आटोपण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२- २३ करित विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांचं प्रवेश प्रक्रिया नुकतीच पार पडली अनेक अभ्यासक्रमांची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी मोठा कालावधी उलटला होता. त्यामुळे मर्यादित वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्यासह परीक्षा घेण्याचे शिवधनुष्य महाविद्यालय प्रशासनाला पेलावे लागत होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान पाहता वेळमर्यादेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात होती. या दरम्यान विद्यार्थ्यांना परीक्षांची तयारी करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा व योग्य प्रकारे नियोजन करता यावे, या उद्देशाने सीईटी सेलतर्फे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या सीईटी परीक्षांच्या संभाव्य वेळापत्रकाची घोषणा केलेली आहे.

### प्रमुख परीक्षेच्या संभाव्य तारखा

| अभ्यासक्रम | संभाव्य परीक्षा कालावधी |
|---|---|
| एमएचटी-सीईटी पीसीएम ग्रुप | ९ ते १३ मे |
| पीसीबी ग्रुप | १५ ते २० मे |
| एमबीए सीईटी | १८ व १९ मार्च |
| एलएलबी (५ वर्षे) | १ एप्रिल |
| एलएलबी (३ वर्षे) | २ व ३ मे |
| बी.एड.-एम.एड. | २ एप्रिल |

### गतवर्षीची पुनरावृत्ती नको

▪ शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करितादेखील अशाच प्रकारे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. परंतु, शुद्धीपत्रक काढताना या तारखांमध्ये बदल करत ऑगस्टमध्ये सीईटी परीक्षा ढकलण्यात आल्या होत्या. यामुळे प्रवेश प्रक्रियेचा खोळंबा झाला होता. यावर्षी याबाबत पुनरावृत्ती व्हायला नको, अशी माफक अपेक्षा पालक, विद्यार्थ्यांकडून व्यक्त होते आहे.

आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com



# विद्यार्थी, पालकांसह शिक्षकांचा सत्कार

## वाघ अभियांत्रिकीतर्फे अभिनव उपक्रम

**नाशिक** । शहरातील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात दरवर्षाप्रमाणे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अखेरच्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ५० हून अधिक विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळालेल्या विद्यार्थी, पालक व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्याला घडविण्यात आई-वडील व शिक्षकांचा सिंहाचा वाटा असतो. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयातर्फे निवड झालेले विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे अभियांत्रिकी महाविद्यालय व्यतिरिक्त शाळा व महाविद्यालयात (गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक -१२, के. के. वाघ पॉलिटेक्निक -१३) अशा २५ विद्यार्थ्यांचे त्या संस्थेत जाऊन त्यांच्या प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना सरासरी ४ व कमाल १० लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाला २०२३ मध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळालेला आहे. त्या अंतर्गत अनेक नावीन्य पूर्ण उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी दिली. अशा विद्यार्थी व पालक यांचा सत्कार प्रसंगी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक सामनगाव येथील प्राचार्य प्रा. डी. पी. नाठे, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर, संगणक विभाग प्रमुख डॉ. एस. एस. साने, प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे व डॉ. पी. के. शहाबादकर उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त व सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी सत्कार झालेल्या विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे अभिनंदन केले.

आपलं महानगर | My महानगर .com
www.mymahanagar.com

# क. का. वाघ : गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणारी शिक्षण संस्था

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ हे एक समाजाभिमुख, राष्ट्र कार्याला समर्पित व सर्वार्थाने समाजन्नोतीसाठी प्रयासरत असलेले समाजपुरूष होते. काळाची पावले ओळखून समाजाला योग्य दिशेने नेणारे पुरोगामी नेते होते. शिक्षण हा समाजाच्या सर्वांगिण विकासाचा पाया आहे, अशी त्यांची धारणा होती. त्या धारणेला अनुसरून ग्रामीण भागाच्या उत्थानासाठी सन १९७० मध्ये त्यांनी कर्मवीरांच्या प्रेरणेने के. के. वाघ शिक्षण संस्थेची महुर्तमेढ रोवली. संस्थेचे दिवंगत अध्यक्ष व आमचे प्रेरणास्थान आदरणीय कै. बाळासाहेब देवराम वाघ यांनी संस्था स्थापणेपासून विश्वस्त, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्ष त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था खंबीरपणे उभी राहीली. संस्था उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्यानंतर संस्थेचे विद्यमान अध्यक्ष समीर वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची वाटचाल अव्याहतपणे सुरु आहे.

समाज आणि राष्ट्राच्या प्रगतिसाठी लावलेला हा शिक्षणचा वेलू आज गगनात झेपावतो आहे. वर्तमान परिस्थितीत के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक जिल्ह्यातील अग्रेसर व गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणारी संस्था म्हणून नावारुपास आलेली आहे. गेल्या ५१ वर्षांच्या कालावधीत संस्थेने अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षणाच्या विकासावर लक्ष केंद्रीत करून अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या क्षितीजावर गुणवत्तेने परिपूर्ण संस्था असा नावलौकीक मिळवला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयास शैक्षणीक वर्ष २०२२-२३ ते २०३१ - ३२ या दहा वर्षासाठी ऑटोनॉमस अर्थात स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाला आहे. तसेच नऊ विभागांना एन.बी.ए मानांकन प्राप्त झाले आहे. यामध्ये कॉम्प्युटर, प्रॉडक्शन, इलेक्ट्रकल, केमिकल आणि इलेक्ट्रनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हील आणि एम.सी. ए. यांचा समावेश आहे. ९ विभागांना मानांकन मिळवणारे के. के. वाघ हे पुणे विद्यापीठांतर्गत नाशिक विभागातील पहिले महाविद्यालय ठरले आहे. पारंपारीक शिक्षणाबरोबर ललितकला, शिक्षणशास्त्र व कृषीविज्ञानाच्या क्षेत्रातही आपली चुणूक दाखवित आजमितीस एकूण ३० वेगवेगळ्या संस्था दिमाखात उभ्या आहेत. अनेकविध विद्याशाखांमध्ये शिक्षण प्रदान करतांना कलेच्या प्रांतातही संस्थेने के. के. वाघ कला अकादमी अंतर्गत फाईन आर्टस् व परफॉर्मिंग आर्टस महाविद्यालय सुरू करून नवा पायंडा घातला आहे. संगीत, नृत्य, नाटक व प्रयोगशिवी कला या विभागात पदवीपर्यंतचे शिक्षण प्रदान करणारी ही एकमेव संस्था आहे. सी. बी. एस. ई. शिक्षण प्रणालीच्या शाळा सुरू करून संस्थेने अद्ययावत शिक्षण व्यवस्थेचा पायंडा निर्माण केलेला असतांनाच संस्थेने नाशिक व चांदोरी येथे अनुक्रमे बी.फार्मसी आणि डी. फार्मसी महाविद्यालय सुरू करत वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात पाऊल टाकले आहे.

सध्या संस्थेच्या विविध शाखांमध्ये २१ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून लाखो माजी विद्यार्थी समाजात आपली वाटचाल करत आहेत.

के. के. वाघ तंत्रनिकेतन, नाशिक कॉम्प्युटर टेक्नालॉजी, इन्फोमिशन टेक्नालॉजी, मेकॅनिकल इंजिनीअरींग, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रिकल इंजिनीअरींग, केमिकल इंजिनीअरींग, सिव्हील इंजिनीअरींग अशा विविध ७ शाखांमध्ये डिप्लोमा प्रदान करणारे तंत्रनिकेतन आहे. याशिवाय 'अॅडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी' हा औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असणारा कोर्सही या तंत्रनिकेतनमध्ये शिकविला जातो.

मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे, भाऊसाहेबनगरचे अनोखे गुरुकुल, बँकींग, व्यायामशाळा, कॅन्टीन, ग्राहक भांडार, स्वतंत्र पार्कींग, बसव्यवस्था, सुरक्षा कर्मचारी, इ. सुविधांसह ३० महाविद्यालये, तंत्रनिकेतने, स्कुल्स कार्यान्वित आहेत. आगामी काळात ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तंत्रशिक्षणाची व्यवस्था थेट ग्रामीण भागात करण्याचा संस्थेचा मानस आहे.

के. के. वाघ कला अकादमी अंतर्गत फाईन आर्टस् व परफॉर्मिंग आर्टस महाविद्यालय सुरू करत संस्थेने सर्वसामान्य व बहुजनांसाठी कलेचा हा प्रांत खुला करून नवा पायंडा निर्माण केला आहे. असा पायंडा निर्माण करण्यामागे शिक्षणसंस्थेच्या प्रबंधनाची समाजाप्रती असलेली बांधिलकी, बहुजनांचा शिक्षणविस्तार व भारतीय अभिजात कलागुणांचे पुनरूज्जीविकरणचा विचार प्रतिबिंबित होतो. कृषी महाविद्यालयाअंतर्गत कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन व उद्यानविद्या महाविद्यालय अशी ६ महाविद्यालये कार्यरत आहेत. कृषी तंत्रनिकेतन हा कृषी शिक्षणातील डिप्लोमा कोर्स सुरू करावयाचा संस्थेचा मानस असून त्यादृष्टीने पावले उचलली जात आहेत. कृषी शिक्षणाच्या ह्या सर्व विद्याशाखांमध्ये आजमितीस १,८०४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.अशातऱ्हेने महाराष्ट्रात कृषी शिक्षण देणारी सर्वात मोठी संस्था म्हणून के के वाघ शिक्षण संस्था नावारुपाला आली आहे.

**-समीर बाळासाहेब वाघ,**
अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक



नाशिक : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर निवडलेल्या प्राध्यापकांच्या सत्कारप्रसंगी डावीकडून प्रा. शिरीष साने, प्राचार्य केशव नांदूरकर, संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ, प्रा. व्यंकट माने व प्रा. प्रशांत कुशारे.

# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या प्राध्यापकांची पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर निवड

**नाशिक : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे नुकतीच सन २०२३ ते २०२७ या कालावधीसाठी अभ्यास मंडळाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. या अभ्यास मंडळावर के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापकांची निवड झाली आहे.

त्यामध्ये के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. केशव नांदुरकर यांची प्रॉडक्शन अँड इंडस्ट्रियल इंजिनिअरिंगच्या अभ्यास मंडळावर तर केमिकल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. व्यंकट माने यांची केमिकल अँड पेट्रोलियम इंजिनिअरिंगच्या अभ्यास मंडळावर निवड झाली. तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्राध्यापक डॉ. प्रशांत कुशारे यांची मेकॅनिकल अँड ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगच्या अभ्यास मंडळावर बिनविरोध निवड झाली. सर्व प्राध्यापकांचा अभ्यास मंडळावरील कार्यकाळ सन २०२३ ते ऑगस्ट २०२७ पर्यंत आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे चे मा. कुलगुरू यांच्यातर्फे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कॉम्प्युटर विभागाचे विभागप्रमुख डॉ. शिरीष साने यांची कॉम्प्युटर प्लिकेशन या विद्याशाखेच्या अभ्यास मंडळावर अध्यक्ष म्हणून दोन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

निवड झालेल्या सर्व प्राध्यापकांचे संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठ पातळीवर काम करताना उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमात बदल करण्याचे प्रयत्न करावे असे प्रतिपादन समीर वाघ यांनी व्यक्त केले. तसेच या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी त्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पुढारी

## संक्षिप्त



नाशिक : प्राध्यापकांच्या सत्काराप्रसंगी प्रा. शिरीष साने, प्राचार्य केशव नांदूरकर, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, प्रा. व्यंकट माने, प्रा. प्रशांत कुशारे.

# वाघ अभियांत्रिकीचे प्राध्यापक विद्यापीठावर

**नाशिक** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर २०२३ ते २०२७ या कालावधीसाठी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या चार प्राध्यापकांची निवड झाली आहे. निवड झालेल्या प्राध्यापकांचा अभ्यास मंडळावरील कार्यकाळ ऑगस्ट २०२७ पर्यंत असणार आहे. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांची 'प्रॉडक्शन अॅण्ड इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग'च्या अभ्यास मंडळावर, तर केमिकल इंजिनिअरिंग विभागाचे विभागप्रमुख डॉ. व्यंकट माने यांची 'केमिकल अॅण्ड पेट्रोलियम इंजिनिअरिंग'च्या अभ्यास मंडळावर निवड झाली. तर मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रा. डॉ. प्रशांत कुशारे यांची 'मेकॅनिकल अॅण्ड ऑटोमोबाइल इंजिनिअरिंग'च्या अभ्यास मंडळावर बिनविरोध निवड झाली. विद्यापीठाच्या कुलगुरूंतर्फे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संगणक विभागप्रमुख डॉ. शिरीष साने यांची 'कॉम्प्युटर अॅप्लिकेशन' या विद्याशाखेच्या अभ्यास मंडळावर अध्यक्ष म्हणून दोन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. निवड झालेल्या सर्व प्राध्यापकांचे संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यापीठ पातळीवर काम करताना उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमात बदल करण्याचे प्रयत्न करावे, असे आवाहन वाघ यांनी केले.

My Nashik Edition
Jan 19, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# वाघ अभियांत्रिकीच्या प्राध्यापकांची निवड

**पंचवटी ।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे नुकतीच सन २०२३



ते २०२७ या कालावधीसाठी अभ्यास मंडळाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. या अभ्यास मंडळावर के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांची निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांची प्रॉडक्शन अॅण्ड इंडस्ट्रीयल इंजिनिअरिंगच्या अभ्यास मंडळावर तर डॉ. व्यंकट माने यांची केमिकल अॅण्ड पेट्रोलियम इंजिनिअरिंगच्या अभ्यास मंडळावर तसेच प्राध्यापक डॉ. प्रशांत कुशारे यांची मेकॅनिकल अॅण्ड ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगच्या अभ्यास मंडळावर बिनविरोध निवड झाली. सर्व प्राध्यापकांचा अभ्यास मंडळावरील कार्यकाळ सन २०२३ ते ऑगस्ट २०२७ पर्यंत आहे. तसेच डॉ. शिरीष साने यांची कॉम्प्युटर अॅप्लिकेशन या विद्याशाखेच्या अभ्यास मंडळावर अध्यक्ष म्हणून दोन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. निवड झालेल्या प्राध्यापकांचा समीर वाघ यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठ पातळीवर काम करताना उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमात बदल करण्याचे प्रयत्न करावे, असे प्रतिपादन समीर वाघ यांनी केले. या यशाबद्दल अशोक मर्चंट, प्रा. के. एस. बंदी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# 'चेंबर्स'तर्फे आज मार्गदर्शन

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँण्ड अॅग्रीकल्चर यांच्यातर्फे डेव्हलपिंग आंत्रप्रेनरशिप माइंडसेट या विषयावर आज, शुक्रवारी (दि. २०) सायंकाळी साडेपाच वाजता मार्गदशर्न सत्र होणार आहे. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात होणाऱ्या कार्यक्रमात 'एमसीसीआयए'चे प्रेसिडेंट ललित गांधी, वरिष्ठ जनरल मॅनेजर जयकारा शेट्टी मार्गदर्शन करतील.

# वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांची अभ्यास मंडळावर निवड

## यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्याकडून सत्कार

▸ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १९ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे नुकतीच २०२३ ते २०२७ या कालावधीसाठी अभ्यास मंडळाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. या अभ्यास मंडळावर के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापकांची निवड झाली आहे.

निवड झालेल्या प्राध्यापकांत वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांची प्रॉडक्शन अँन्ड इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंगच्या अभ्यास मंडळावर तर केमिकल इंजिनिअरिंग विभागाचे विभागप्रमुख डॉ. श्यंकर माने यांची केमिकल अँन्ड पेट्रोलियम इंजिनिअरिंगच्या अभ्यास मंडळावर निवड झाली. तसेच, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रा. डॉ. प्रशांत कुशारे यांची मेकॅनिकल अँन्ड ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगच्या अभ्यास मंडळावर बिनविरोध निवड झाली. सर्व प्राध्यापकांचा अभ्यास मंडळावरील कार्यकाळ २०२३ ते ऑगस्ट २०२७ पर्यंत आहे. याशिवाय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंतर्फे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कॉम्प्युटर विभागाचे विभागप्रमुख डॉ. शिरीष साने यांची कॉम्प्युटर ॲप्लिकेशन या विद्याशाखेच्या अभ्यास मंडळावर अध्यक्ष म्हणून दोन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. निवड झालेल्या सर्व प्राध्यापकांचा संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी त्यांचे अभिनंदन केले.



नाशिक : प्राध्यापकांच्या सत्कारप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, प्राचार्य केशव नांदूरकर, प्रा. शिरीष साने व प्रा. प्रशांत कुशारे.

# उद्योगातील वास्तव समजून ३० हजार विद्यार्थी तयार करणार

## कांतीलाल चोपडा : डेव्हलपिंग इंटरप्रनल माईंड सेट या विषयावर सेमिनार

नाशिक : प्रतिनिधी

उद्योगांची प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज व विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाधिकारी कौशल्याद्वारा नोकरी मिळण्यासाठी महाराष्ट्र चेंबर तर्फे [illegible] कार्यक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांना उद्योगांशी जोडण्यासाठी त्यांची प्रक्रिया उत्पादने आणि आव्हान [illegible] समजून घेण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले असून विद्यार्थ्यांना उद्योगातील वास्तव समजून प्रत्यक्ष कामासाठी ३०००० विद्यार्थ्यांना तयार करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाधारित कौशल्यानुसार नोकरी व उद्योजकांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना उद्योगांमध्ये येणाऱ्या अडचणी समजून घेणे, त्यांची कारणे शोधून काढणे, त्यांचा अहवाल तयार करणे, आणि डिजिटल माहिती तयार करणे [illegible] उपाय व समाधान करण्याचे कौशल्य या विद्यार्थ्यांना या कार्यक्रमांतर्गत शिकविण्यात येणार आहे त्यासाठी त्यांना तज्ञ उद्योजकांचेही मार्गदर्शन लाभणार असून विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र चेंबरचे उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन कांतिलाल चोपडा यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर व के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अँड रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने डेव्हलपिंग इंटरप्रनल माईंड सेट या विषयावर सेमिनार संपन्न झाले.



कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र शाखेचे चेअरमन कांतिलाल चोपडा, सेनेरा इंजीनियरिंग लिमिटेड पुणे चे वरिष्ठ महाव्यवस्थापक जयकरण शेट्टी, डीटीईचे सहसंचालक प्रोफेसर डी पी नाठे, के. के. वाघ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आर्किटेक्ट समीर वाघ, के. के. वाघ कॉलेजचे आचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, मनीष पाटील, समन्वयक विक्रम बालाजीवाले यांच्यासह उपस्थित होते.

के. के. वाघ कॉलेजचे [illegible] समीर वाघ यांनी महाराष्ट्र चेंबरने सुरू केलेल्या उपक्रमाचे कौतुक केले व उद्योग व विद्यार्थी यांच्यात समन्वय करून उद्योगांना कुशल मनुष्यबळ व विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्यास उपयुक्त ठरणार असून के. के. वाघ कॉलेज यात सहभागी होत असल्याचे सांगितले.

मनीष पाटील यांनी आत्मनिर्भर भारत या मोहिमेला प्रतिसाद देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर कटिबद्ध आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली [illegible] प्रोग्रॅम हा अभिनव उपक्रम हाती घेतलेला आहे. उद्योग व शिक्षण संस्था यांच्यामध्ये समन्वय करून विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण करण्याचे काम या प्रोग्रामच्या माध्यमातून होत आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे ३०००० विद्यार्थ्यांना उद्योगाशी संलग्न होण्याची संधी या उपक्रमातून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

नाशिक जिल्ह्यामध्ये या उपक्रमाची सुरुवात के. के. वाघ इंजिनिअरिंग कॉलेजच्या कॅम्पसमधून करण्यात आली. के. के. वाघ महाविद्यालयामधील [illegible] विद्यार्थी व ३५ शिक्षकांना या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत नुकताच उद्योग व शिक्षण संस्था यांचा समन्वय मेळावा के. के. वाघ इंजिनिअरिंग कॉलेजच्या ऑडिटोरियममध्ये पार पडला. याप्रसंगी डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन नाशिक विभाग डीटीईचे सहसंचालक प्रोफेसर डी. पी. नाठे, विक्रम बालाजीवाले, [illegible] इंजिनिअरिंगचे जयकरण शेट्टी, के. के. वाघ इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य नांदुरकर यांनी उपस्थितांना उपक्रमासंदर्भात माहिती दिली.

कार्यक्रमाप्रसंगी नाशिक जिल्ह्यातील अनेक शिक्षण संस्थांचे प्राचार्य व उद्योगातील अनेक मान्यवर उपस्थित होते. श्री [illegible] यांनी उपस्थितांचे आभार मानले. इतर महाविद्यालयांनीसुद्धा या उपक्रमात भाग घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशदूत

# कर्मवीर स्मृती चषक कबड्डी स्पर्धांचे उद्घाटन

नाशिक । दि. १२ प्रतिनिधी

सध्याच्या युगात शिक्षणाबरोबर खेळाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. आजचा युवक हा सोशल मीडियाच्या आहारी गेलेला आहे. त्याचे दुष्परिणाम आपण समाजव्यवस्थेत झालेले पाहतो आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यामध्ये खेळाची आवड निर्माण करून त्यास प्रोत्साहित केले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रीय खेळाडू राधिका गाडगीळ-पैठणकर यांनी केले.


के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माईल व स्पिनॅच नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने काकासाहेबनगर महाविद्यालयात पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृतिचषक क्रीडा स्पर्धांना उत्साहात प्रारंभ झाला. या स्पर्धेअंतर्गत काकासाहेबनगर येथील शैक्षणिक संकुलात कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी स्माईल व स्पिनॅच नाशिक संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ होते. उद्घाटनानंतर कबड्डी स्पर्धेला सुरुवात झाली. ४४ संघांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल गवारे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय देत, स्पर्धेचे महत्त्व पटवून दिले. प्राचार्य शरद कदम यांनी प्रास्ताविकात स्पर्धेचा उद्देश स्पष्ट केला. प्रा. मिलिंद पवार आणि प्रा. गणेश आवारे यांनी सूत्रसंचालन केले. आभार क्रीडा संचालक सुजित मेधने यांनी मानले.

Deshdoot Edition
Jan 13, 2023Page No. 9
Powered by : eReleGo.com




Divya marathi 25-01-2023

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

|| प्रथम पुण्यस्मरण ||

कर्मयोगी

बाळासाहेब (भाऊ)

देवराम वाघ

सुरु आहे वाटचाल आपल्या आशीर्वादाने, जीवन पथावर चालत राहू आपल्या आदर्श संयमाने, सदैव जपतो आम्ही आपल्या पवित्र स्मृतीला!

श्री. समीर बाळासाहेब वाघ
अध्यक्ष
के के वाघ शिक्षण संस्था, नाशिक

वि | न | म्र | अ | भि | वा | द | न

**K K Wagh Education Society, Nashik**

Engineering | MBA & MCA | Polytechnic | Pharmacy | Agriculture & Allied Colleges | B.Ed. | Fine Arts, Performing Arts | Arts, Commerce, Science & Computer Science Colleges | CBSE Schools | English & Marathi Medium Schools (SSC)


AapleMahanagar Edition
Jan 25, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# महाराष्ट्राच्या कृषि शिक्षणाला आधुनिक दृष्टिकोन देणारे

## स्वर्गीय बाळासाहेब देवराम वाघ





– अनिल प. मेहेर

AapleMahanagar Edition
Jan 25, 2023 Page No. 10
Powered by : eReleGo.com

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# महाराष्ट्राच्या कृषि शिक्षणाला आधुनिक दृष्टिकोन देणारे

## स्वर्गीय बाळासाहेब देवराम वाघ

महाराष्ट्राच्या जमिनीत शेती, सहकार आणि शिक्षण रूजवणारे स्वर्गीय पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांचा वारसा जपणारे महाराष्ट्र असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ ॲग्रीकल्चर ॲन्ड ॲलाइड कॉलेजेसचे अध्यक्ष स्वर्गीय बाळासाहेब देवराम वाघ म्हणजे भारतीय शेती विकासाचे दीपस्तंभ होते.







– अनिल प. मेहेर


|| प्रथम पुण्यस्मरण ||



कर्मयोगी
बाळासाहेब (भाऊ)
देवराम वाघ

सुरु आहे वाटचाल आपल्या आशीर्वादाने, जीवन पथावर चालत राहू आपल्या आदर्श संयमाने, सदैव जपतो आम्ही आपल्या पवित्र स्मृतीला!

श्री. समीर बाळासाहेब वाघ
अध्यक्ष
के के वाघ शिक्षण संस्था, नाशिक

वि | न | म्र | अ | भि | वा | द | न


**K K Wagh Education Society, Nashik**

Engineering | MBA & MCA | Polytechnic | Pharmacy | Agriculture & Allied Colleges | B.Ed. | Fine Arts, Performing Arts | Arts, Commerce, Science & Computer Science Colleges | CBSE Schools | English & Marathi Medium Schools (SSC)

# वाघ शिक्षण संस्थेत चर्चासत्र

▶▶ **पंचवटी** । दि. २४ प्रतिनिधी

शैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर असणाऱ्या नाशिक येथील के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकताच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ऍग्रीकल्चर



यांच्या संयुक्त विद्यामाने डेव्हलपिंग इंटरपॅर्नेशिप माइंडसेट हा कार्यक्रम झाला. यावेळी प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी महाविद्यालयाबाबत माहिती दिली. कार्येक्रमाचे अध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरबद्दलं माहिती दिली. तसेच मनीष पाटील, प्रा. डी. पी. नाठे, जयकर शेट्टी यांनी मार्गदर्शन केले. के के वाघ अभियांत्रिकी माजी विध्यार्थी श्री जयेश टोपे, फाउंडर आणि मॅनेजिंग डायरेक्टर, रिव्हॅम्प मोटो यांना नुकतेच केंद्रीय मंत्री मा. पियुष गोयल यांच्या हस्ते दिल्ली मध्ये नॅशनल स्टार्टअप अवॉर्ड ·नॅशनल स्टार्टअप डे च्या दिवशी प्रदान करण्यात आले. जयेश टोपे यांच्या यशाबद्दल के. के. वाघ संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल चौधरी व आकांक्षा पिसोळकर यांनी केले.


2023-1-25 13

**Deshdoot, 25-01-2023**

# शैक्षणिक कार्याला वाहून घेतलेले भाऊ : बाळासाहेब वाघ

नाशिक येथील कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब वाघ ऊर्फ भाऊ यांना जाऊन एक वर्ष होत आले, तरीही भाऊ आपल्या शैक्षणिक संकुलात आहेत असेच वाटते. केव्हाही संस्थेच्या अतिथिगृहात पोहोचल्यावर भाऊ तिथे असायचेच. एखादी व्यक्ती आपल्याकडे आली की, आपण एखादे वेळेस शाल व श्रीफळ देऊन स्वागत करतो परंतु कितीही वेळा अतिथिगृहात कामानिमित्त गेलो, तरी प्रत्येक वेळी भाऊ अगत्यपूर्वक स्वागत करायचे. आपुलकीने आमच्या परिवाराची चौकशी करायचे. मीदेखील खेडेगावातून शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे आमची फ्रीक्वेन्सी मॅच व्हायची. त्यांच्या बोलण्यात शेतकऱ्यांच्या व मजुरांच्या मुलांनी शिकायला पाहिजे, यासाठी तळमळ असायची.

खेडेगावात शिक्षणाच्या बऱ्याच समस्या असतात. लहान-लहान खेडी किंवा वस्त्यांमध्ये प्राथमिक शिक्षणाचीदेखील सोय नसते. मुलींच्या बाबतीत तर मुलगी शाळेत जाऊन घरी येईपर्यंत पालक काळजीत असायचे. या अडचणींमुळे काही मुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागत असे. मुला-मुलींच्या व पालकांच्या अडचणी लक्षात घेऊन भाऊंनी त्या काळात कृषी पदवीधर असूनही सुरुवातीची काही वर्षे नोकरी केल्यानंतर समाजातील सर्व घटकांना शैक्षणिक सुविधा



उपलब्ध करून देण्यासाठी १९७० साली कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेची स्थापना केली.

मुलांना व्यवहारोपयोगी कौशल्य शिक्षण मिळाले, तर मिळालेल्या ज्ञानावर व कौशल्यावर ते लहानसहान व्यवसाय किंवा नोकरी करू शकतील या विचाराने भाऊंनी कौशल्य शिक्षण महाविद्यालय सुरू करण्याचे ठरविले व के. के. वाघ पॉलिटेक्निकची १९८३ साली नाशिकला स्थापना केली. त्यानंतर पुढल्या वर्षी १९८४ ला के.के.वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय व संशोधन संस्थेची स्थापना केली.

भाऊंनी त्यानंतर कला, विज्ञान, वाणिज्य व संगणकशास्त्र शिक्षणाचा लाभ सर्वसामान्य मुलांना मिळावा यासाठी कला, विज्ञान, वाणिज्य व संगणकशास्त्र महाविद्यालयांची नाशिक, चांदोरी, काकासाहेबनगर व पिंपळस रामाचे व नाशिक येथे औषध निर्माणशास्त्र या महाविद्यालयांची स्थापना केली. यातून असे लक्षात येते की, संस्थेने के.जी.पासून पी.जी. तसेच विद्यावाचस्पती पीएचडीपर्यंतचे शिक्षण उपलब्ध करून दिले. मी महाराष्ट्र शासनाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शुल्क निर्धारण समितीवर कार्यरत असतांना बरेच वेळा भाऊंची तेथेही भेट व्हायची व चर्चा व्हायची.

के.के.वाघ शिक्षण संस्था चालवत असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने नॅक मूल्यांकन झाले होते. त्यावेळी सर्वांनी नॅकच्या मूल्यांकनासाठी जास्तीत जास्त वेळ द्या व लवकरात लवकर नॅक मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण करा असा सल्ला दिला होता. मला नमूद करताना आनंद होत आहे की, भाऊंच्या इच्छेनुसार नाशिक व चांदोरी येथील के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालयांचे मूल्यांकन झाले असून, या महाविद्यालयांना पहिल्या फेरीतच चांगला दर्जा मिळाला आहे. हा दर्जा प्राप्त करण्यात संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सर्व संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, डॉ. व्ही. एम. सेवलीकर, डॉ. ए. पी. राजपूत, डॉ. आर. के. दातीर यांचे सहकार्य लाभले होते.

भाऊंच्या कार्याची दखल घेऊन पुणे विद्यापीठाने २००८ साली भाऊंना जीवनसाधना गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. भाऊंना नाशिक भूषण पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते. भाऊंनी सुरू केलेले सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्य असेच जोमाने सुरू राहायला हवे ही सदिच्छा. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन

- **डॉ. आर. एस. माळी,**
माजी कुलगुरू, क. ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

Nashik Edition
Jan 28, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# आदरणीय भाऊ



- शेखर गायकवाड

---

आपलं महानगर | My महानगर.com

# वाघ शिक्षण संस्थेतर्फे डॉ.बांदल यांचा सत्कार



नाशिक । राष्ट्रीय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदतर्फे (एआयसीटीई) शासकीय तंत्रनिकेतन पुणे येथील प्राचार्य डॉ. विठ्ठल श्रीरंग बांदल यांना नुकताच राष्ट्रीय तंत्र शिक्षक पुरस्कार (एसटीटीए) २०२२ या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.डॉ. विठ्ठल बांदल यांची एआयसीटीईद्वारे नुकतीच अँप्रुव्हल प्रोसेस हँडबुक समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी के.के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, आयसीटी जालनाचे डायरेक्टर डॉ. उदय अनापुरे, उद्योजक सुधीर मुतालिक संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी, तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे उपस्थित होते.

AaplaMahanagar Edition
Jan 12, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# वाघ अभियांत्रिकीतर्फे विद्यार्थी, पालकांचा सत्कार



नाशिक : वार्ताहर

शैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर असणाऱ्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात कालानुक्रमाने यंदाही अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अखेरच्या वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ५० हून अधिक विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळालेल्या विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांना घडविण्यात आई-वडील व शिक्षक ह्यांचा सिंहाचा वाटा असतो. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयातर्फे निवड झालेले विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे अभियांत्रिकी महाविद्यालय व्यतिरिक्त शाळा व महाविद्यालयात असे की, गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक येथील १२ तर के के वाघ पॉलिटेक्निक येथील १३ अशा एकूण २५ विद्यार्थ्यांचे त्या संस्थेत जाऊन त्यांच्या प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ह्या सर्व विद्यार्थ्यांना सरासरी ४ आणि जास्तीत जास्त १० लाखांचे वार्षिक पॅकेज प्राप्त झालेले आहे. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाला २०२३ मध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळालेला आहे. त्या अंतर्गत अनेक नाविन्य पूर्ण उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी दिली.

अशा विद्यार्थी व पालक यांचा सत्कार प्रसंगी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक शासकीय येथील प्राचार्य प्रा. डी. पी. जेडे, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, संगणक विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे व डॉ. पी. के. शहाबादकर उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ, सर्व विश्वस्त व सचिव प्रा. के.एस. बंदी यांनी सत्कार झालेल्या विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे अभिनंदन केले.



नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात गौरविण्यात आलेले पालक, शिक्षक व विद्यार्थी.

# वाघ अभियांत्रिकीतर्फे पालकांचा सत्कार

नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात अखेरच्या वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ५० हून अधिक विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळालेल्या विद्यार्थी, पालक व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. या वेळी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक सामनगाव येथील प्राचार्य प्रा. डी. पी. नाठे, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर, संगणक विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे व डॉ. पी. के. शहाबादकर उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त व सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी सत्कार झालेल्या विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे अभिनंदन केले.

# काकासाहेब वाघ स्मृती चषक स्पर्धा

## के. के. वाघ शिक्षण संस्था व स्माईल व स्पिनॅच तर्फे आयोजन

**नाशिक :**

के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक व स्मार्ट मॅनिजमेंट इंटरफेस लोकल एक्सचेंज (स्माईल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलन्स यांचे संयुक्त विद्यमाने कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती चषक या नाशिक जिल्हा आणि निफाड, चांदवड,दिंडोरी, सिन्नर व येवला तालुका मर्यादित क्रीडा ग्रामीण स्पर्धांचे आयोजन दिनांक ७ ते १४ जानेवारी या दरम्यान करण्यात आले आहे.

दिनांक ७ जानेवारी २०२३ रोजी के के वाघ विद्याभवन, भाऊसाहेबनगर येथे अजिंक्य वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत उदघाटन होणार आहे.

त्यानंतर रस्सीखेच व मल्लखांब स्पर्धेला प्रारंभ होईल. तसेच दिनांक ८ ते १३ जानेवारी दरम्यान क्रिकेट स्पर्धा होणार आहेत. दिनांक ८ जानेवारी २०२३ रोजी के के वाघ वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळस येथे जिल्हास्तरीय कुस्ती व दिनांक ९ रोजी के के वाघ युनिव्हर्सल स्कूल डीजीपीनगर, नाशिक येथे जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. दिनांक १० ते दिनांक १२ जानेवारी २०२३ रोजी के के वाघ आभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक येथे मुलांसाठी (नाशिक ग्रामीण) फुटबॉल स्पर्धा होतील.

दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजी के के वाघ वरिष्ठ महाविद्यालय; काकासाहेब नगर(रानवड) येथे मुले व मुलींसाठी कबड्डी तर के के वाघ तंत्रनिकेतन,नाशिक येथे स्क्वॅश स्पर्धेचे आयोजन केले गेले आहे. दिनांक १२ व १३ जानेवारी रोजी चांदोरी येथील के के वाघ वरिष्ठ महाविद्यालय, के के वाघ औषधनिर्माणशास्त्र व के के वाघ युनिव्हर्सल येथे मुले व मुलींसाठी अनुक्रमे व्हॉलीबॉल व खो-खो या दोन स्पर्धा होणार आहेत. दिनांक १३ रोजी सरस्वतीनगर येथील के के वाघ एज्युकेशन कॅम्पस येथे मुले. व मुलींसाठी जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेने पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती चषक स्पर्धेची सांगता होईल. दिनांक १४ रोजी सकाळी ११ वाजता के के वाघ विद्याभवन, भाऊसाहेबनगर बक्षीस वितरण समारंभ पार पडणार आहे. या वितरण समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून पुणे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दीपक माने हे उपस्थित राहणार आहेत. या विविध स्पर्धांसाठी वैयक्तिक व संघीय गटात रुपये ५०० पासून ते ३१००० पर्यंत बक्षीस देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी स्पर्धांत सहभागी व्हावे असे आवाहन के. के.वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ व स्मार्ट मॅनिजमेंट इंटरफेस लोकल एक्सचेंज (स्माईल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलन्सचे सचिव अजिंक्य वाघ यांनी केले आहे. स्पर्धकांनी अधिक माहिती व प्रवेश नोंदणीसाठी सुनील निरगुडे(९३२६८९५५६५) व सारंग नाईक(९९२३३३२९५० ) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती करंडक स्पर्धा शनिवारपासून

नाशिक, ता. ३ : के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक व स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्सचेंज (स्माईल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलन्स यांचे संयुक्त विद्यमाने संस्था संलग्न महाविद्यालय, तंत्रनिकेतन व शाळा येथे पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती चषक या नाशिक जिल्हा आणि निफाड, चांदवड, दिंडोरी, सिन्नर व येवला तालुका मर्यादित क्रीडा ग्रामीण स्पर्धांचे आयोजन ७ ते १४ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे.

स्पर्धांचे यंदा सहावे वर्ष होय. शनिवारी (ता.७) भाऊसाहेबनगर येथे अजिंक्य वाघ उपस्थितीत व प्रमुख पाहुण्याच्या हस्ते उद्घाटन समारंभ पार पडेल. त्यानंतर रस्सीखेच व मल्लखांब या स्पर्धेचा शुभारंभ होईल. तसेच ८ ते १३ जानेवारी दरम्यान क्रिकेट स्पर्धा होणार आहेत. ८ जानेवारीला के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय पिंपळस येथे जिल्हास्तरीय कुस्ती तर ९ जानेवारी रोजी के के वाघ युनिव्हर्सल स्कूल डीजीपीनगर (नाशिक) येथे जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धा होईल. १० ते १२ जानेवारी दरम्यान नाशिकमधील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात फुटबॉल स्पर्धा होतील.

११ जानेवारी रोजी के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय, काकासाहेब नगर (रानवड) येथे मुले व मुलींसाठी कबड्डी तर के के वाघ तंत्रनिकेतन,नाशिक येथे स्क्वॅश स्पर्धा होईल. १२ व १३ जानेवारीला चांदोरी येथील के के वाघ वरिष्ठ महाविद्यालय, के के वाघ औषधनिर्माणशास्त्र व के के वाघ युनिव्हर्सल येथे मुले व मुलींसाठी अनुक्रमे व्हॉलिबॉल व खो-खो या दोन स्पर्धा होणार आहेत. १३ जानेवारीला सरस्वतीनगर येथील के. के. वाघ एज्युकेशन कॅम्पस येथे मुले व मुलींसाठी जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेने पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती चषक स्पर्धेची सांगता होईल.

स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी स्पर्धकांनी ज्या -त्या शाळा व महाविद्यालयाशी संपर्क साधावा, तसेच स्पर्धेबाबत अधिक माहिती व प्रवेश नोंदणीसाठी सुनील निरगुडे (९३२६८९५५६५) व सारंग नाईक (९९२३३३२९५०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांनी सांगितले.